Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# मराठी संगीत नाटकाची गत व सद्यकालीन स्थितीचा आढावा

**प्रा.अविनाश सुदाम भालेराव**
सहयोगी प्राध्यापक
मराठी विभाग
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना
samyaka123@gmail.com

**प्रस्तावना**:

महाराष्ट्रातील बहुतांश प्रांतामध्ये एक विशिष्ट गायन प्रकार म्हणून मराठी नाट्य संगीताची ओळख सर्वसामान्य रसिक प्रेक्षकांना पटलेली आहे. या स्वतंत्र गायन प्रकाराची संगीतातील पार्श्वभूमी जाणून घेताना प्रथम मराठी नाटक आणि त्यातील संगीत विषयीच्या उगमाचा विचार करणे गरजेचा आहे. नाटक हे विविध प्रकारच्या लोकांच्या मनोरंजनाचे साधन आहे. त्यासाठी उत्तम दर्जाचे कथानक, अभिनय, नेपथ्य, वेशभूषा, रंगभूषा आणि संहिता या सर्वांची आवश्यकता असते. जे की मराठी संगीत नाटकाचे वैशिष्ट्ये आहे. नाटकातील भावार्थ हा शब्द आणि स्वर या दोन्हीच्या सहाय्याने फुलवत रसनिर्मिती करणारे संगीत नाटक अधिक गतिमान आहे असे आपणास म्हणता येईल आणि हेच संगीत नाटकात पूर्वापारपासून चालत आलेले आहे, वापरले गेले आहे. असे आपणास दिसून येते. “रंगभूमीवर नटाकडून अभिनयाच्या आणि भाषणाच्याद्वारे लोक समुदायाला सांगितलेली कथा म्हणजे  नाटक होय.”[१]

नाट्यात्मक अनुभव संगीताच्या माध्यमातून जेंव्हा मांडला जातो तेंव्हा ते  ‘नाट्यसंगीत’ म्हणून गणल्या जाते. सर्वसामान्य लोकांच्या अभिरुचीनुसार विविध कालखंडात निरनिराळ्या पध्दतीच्या नाटकाचे सादरीकरण होते आणि तितक्याच वैविध्यतेने नाटकामध्ये संगीताचा प्रवेश झाला आहे. या मराठी रंगभूमीवर संगीत नाटकाची संगीतातील पार्श्वभूमी आणि प्राचीन कालखंडातील संगीत नाटकाचा अभ्यास करणे गरजेचे वाटते.

प्राचीन काळातील संगीत नाटकाची पार्श्वभूमी : भारतभर संगीत नाटकाची परंपरा फार प्राचीन काळापासून दिसून येते. संवाद हा नाटकाचा अविभाज्य घटक आहे. याचे अवलोकन केल्यास ऋग्वेदात काही संवाद्सुक्ते आलेली आहेत. त्यात नाट्याचा उगम शोधता येईल. उदा.

उर्वशी संवाद,यम-यमी संवाद इ. याशिवाय यज्ञसंस्था प्रचलित झाल्यानंतरच्या काळात यज्ञ समारंभाकरिता सर्व पंडित एकत्र जमत असत आणि अनेकाविध,निरनिराळ्या विषयावर ते चर्चा करीत. त्याला ब्रम्होघ असे म्हटल्या जात असे. यज्ञ मंडपात जमलेल्या सामान्य माणसांनाही या चर्चा ऐकायला मिळत. यातून सामान्य माणसांकरिता होणारे विविध मनोरंजनात्मक व बोधात्मक विचार हे नाट्याच्या उत्पत्तीला प्रेरणादायी ठरतात. त्यात सूक्ताचे पठण व ऋचांचे गायनही होत होते. " ज्या ऋचांचे गायन करायाचे त्याची मांडणी सामवेदात आहे. यज्ञ विधीतील या धार्मिक स्वरूपातील गायनावरून नाट्याला गायनाची संगीताची जोड देण्याची कल्पना स्फुरली असण्याची शक्यता आहे"[२] वैदिक आणि बौद्धकाळात या नाट्याचे सादरीकरण होताना दिसून येते. भरताने वर्णन केलेल्या पूर्वरंग विधीत आणि धुव्रागायनात नाट्यसंगीताचे अंश आढळतात. यामुळे प्राचीन काळापासून नाट्य संगीताची परंपरा दिसून येते.

मराठी नाटकाच्या आरंभापासून संगीत हा नाटकाचा अविभाज्य घटक झाला आहे. तरीसुद्धा नाटकातील संगीताचे स्वरूप काळानुसार बदलत गेल्याचे दिसून येते. मराठी नाटकाच्या पूर्वीही भरताच्या नाट्यशास्त्र पासून नाटकामध्ये संगीत वापरले जात होते. "विना गीत नाट्यरंग न गच्छंती"[३] या भरतमुनींच्या उक्तीनुसार नाटकामध्ये संगीत आहे. हे गृहीत धरल्यास काहीही वावगे ठरणार नाही. त्यानंतर संस्कृत नाटके,तंजावरी नाटके यामध्ये संगीताचा वापर केलेला आहे. विष्णुदास भावे यांच्याही सर्व नाटकामध्ये त्यावेळचे प्रचलित संगीत वापरले गेले आहे . त्यामुळे ही सर्व नाटके 'संगीत नाटके' होती. असे म्हटल्यास वावगे ठरू नये. केवळ 'संगीत' नाटक असे नामाभिधान त्याकाळी नव्हते. किर्लोस्करांच्या 'संगीत शाकुंतल' नाटकापासून 'संगीत नाटक' ही संकल्पना रूढ झाली. कै. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांनी जेंव्हा शास्त्रीय संगीत महाराष्ट्रात आणले. तोपर्यंत संगीत नाटक समाजात यशस्वीपणे स्थिरावल्याचे दिसून येते. त्यावेळी संगीताचा आस्वाद घेण्याची एक वेगळीच सामाजिक परिस्थिती होती. "शास्त्रीय संगीत हे श्रीमंत संस्थानिकाच्या आश्रयाखाली होते. मध्यमवर्ग कीर्तनाद्वारे मनोरंजन करून घेत होता तर गरीब-बहुजन समाज तमाशा,गोंधळ अशा लोकसंगीत प्रकारातून मनोरंजन करून घेत आला होता. ह्या तिन्ही वर्गाला एकत्र आणण्याचे काम संगीत नाटकाने केले."[४]

त्यामुळे जनसामान्यामध्ये संगीताचा प्रचार- प्रसार मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. त्याकाळात दूरचित्रवाणी,आकाशवाणीसारखी करमणुकीची साधने नव्हती . त्याकाळात संगीत नाटके आणि त्यातील अवीट गोडीची पदे हीच लोकांच्या करमणुकीची साधने होती. लोकांकडे भरपूर वेळ होता त्यामुळे संगीत नाटकांचा त्यातील पदांचा मनसोक्त आस्वाद घेतला जात असे.

परिणामी समाजातील सर्व स्तरांतील लोकांना शास्त्रीय,उपशास्त्रीय संगीताचा परिचय संगीत नाटकातील पदाच्या माध्यमातून करून दिला. त्यामुळे समाजातील दर्दी लोकांची आवडनिवड अधिक अभिरुचीसंपन्न झाली आणि त्यामधून एक वेगळा असा प्रेक्षक वर्ग संगीत नाटकासाठी तयार होऊ लागला. थोडक्यात नाटकातील संगीतात श्रीमंत ,संस्थानिक, मध्यमवर्ग आणि गरीब-बहुजन समाज ह्या वर्गामध्ये विभागलेले शास्त्रीय संगीत,कीर्तन,तमाशा,गोंधळ इ. लोकसंगीतातील प्रकार या सर्व कथानकाला पोषक असे वातावरण तयार करून त्यामध्य त्याला समाविष्ट करण्यात आले. अशाप्रकारे "नाट्य रसाची अपेक्षा,श्रोत्यांची अपेक्षा आणि अभिजात संगीताचे नियम या तीन घटकाचे रसायन म्हणजे नाट्य संगीत होय."[५]

नाटकातील संवाद हा गद्याने यशस्वी होत असतो परंतु त्याच्या जोडीला पद्याचा आधार घेतला आणि संगीतात्मक संवाद साधला गेला तर तो अधिक परिणामकारक होतो. यामुळे नाटकात अधिक रंजकत्व प्राप्त होते आणि नाटकाच्या आशयाला पोषक ठरेल असा गद्य-पद्यात्मक संवाद हा अधिक प्रभावशाली होतो. "अभिजात संगीताला लालित्याची मर्यादा घालून नाट्यपरिपोषणासाठी उपयोग करून घेणे हे मराठी संगीत नाटकाचे मुलतत्व आहे. नाटकातील घटनात्मक, संघर्षात्मक उत्कर्षाची तीव्रता वाढविण्यासाठी गाण्याचा उपयोग झाला पाहिजे. नाट्य रसाचा उत्कर्ष साधने हे नाटकातील पदाचे उद्दिष्ट असते आणि असायलाही हवे."[६]

संगीत ही नाटकाची रसीकता वाढवित नेणारी शक्ती आहे त्यामुळे नाट्याभाव फुलतो हेच संगीत नाटकाचे महत्वपूर्ण कार्य आहे. कथानकाच्या मागणीनुसार नाटकातील निरनिराळ्या प्रवाहाचा अंतर्भाव होतो. शब्दाला संगीतातील पोषक स्वरांची जोड दिली जाते. नाट्य संगीतात प्रभावीपणे मांडता येते ते दादरा,ठुमरी,लावणी,संगीत इ. प्रकारावर आधारित नाट्य पदे गात

असत. संगीत नाटक रंगमंचाच अविष्कार आहे. आज संगीत नाटकाचे स्वरूप हे कमी झाले असे म्हणण्यापेक्षा लुप्त होताना दियुन येत आहे.

आज संगीत नाटकाचे पुनरुज्जीवन व्हावे. नवीन पिढीला जुन्या व दर्जेदार नाटकाची ओळख होणे गरजेचे वाटते. यातून पारंपारिकरूपाने होणारे संगीत नाटक हा आपल्या मराठी रंगभूमीचा आत्मा आहे. त्याचे जतन आणि संवर्धन होण्यासाठी आज ही संगीत नाट्य परंपरा टिकणे अत्यंत गरजेचे आहे.

**संदर्भ** :

१. ना. सी. फडके : प्रतिभा साधना, हंस प्रकाशन कोल्हपुर १९७६, पृ.१७२

२. डॉ गो.के. भट : संस्कृत नाट्यसृष्टी, कॉ प्रकाशन,पुणे, १९७८, पृ.१२

३. पंडित केदार नाथ: (संपादक) भरतमुनी विरचित नाट्यशास्त्र, भारतीय विद्या प्रकाशन, वाराणसी, १९९८, पृ.४३१

४. कीर्ती शिलेदार : स्वरताल संगती, अहिंसा ट्रस्ट मुंबई , पृ.२९

५. ह. रा. महाजनी : नाट्यसंगीत, मकरंद साहित्य, मुंबई, १९५८, पृ.१७

६. श्रीरंग संगोराम : वेध: संगीत नाटक व नाट्यसंगीत, पी.डी.ए.प्रकाशन, पुणे,१९९३ पृ.०७